

## - प्रकरण चौथे -

# चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि विकास





# प्रकरण चौथे

# चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि विकास

## - अनुक्रमणिका -


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | प्रस्तावना | ८९ |
| ४.२ | चित्रपट माध्यमाचा शोध व विकास | ९० |
| ४.३ | मूकपटाचा जमाना १९१३-१९३१ | ९४ |
| ४.४ | बोलपटाचा जमाना आणि मराठी चित्रपट १९३२-१९७२ | ९७ |
| ४.५ | रंगाचा जमाना आणि मराठी चित्रपट | १०४ |
| ४.६ | नव्या सहस्त्रकातील मराठी चित्रपट | १०५ |
| ४.७ | समारोप | ११२ |
| | संदर्भसूची | ११३ |

# - प्रकरण चौथे -

# चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि विकास

## ४.१ प्रस्तावना :

चित्रपट म्हणजे पडद्यावर उलगडत जाणारे कथानक. आधुनिक काळात इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून पडद्यावर निर्जीव चित्रांचा सजीव आभास निर्माण करणारे तंत्र म्हणजे चित्रपट. माधव शेवाळे म्हणतात की,

**''चित्रपट हे कलात्मकता व तंत्रज्ञान यांचा संगम असलेले सर्जनशील असे दृश्य माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षण यांचे प्रभावी साधन आहे. पडद्यावरील हालत्या चालत्या प्रतिमांतून जीवनाचं दर्शन घडविणारी ही कला छायाचित्रण व इतर तांत्रिक कौशल्य यांचं अपत्य होय.'' ...१**

चित्रपट हे जनसंवादाचे प्रभावी साधन आहे. संवाद किंवा संज्ञापन म्हणजे माहीती भावभावना, कल्पना आणि संकल्पना यांची देवाणघेवाण होण्याची प्रक्रिया.

संवाद म्हणजे एकाच्या डोक्यातील माहीती, कल्पना, वृत्ती-प्रवृत्ति, श्रद्धा, विश्वास इ. चे चित्र दुसऱ्याच्या डोक्यात केवळ प्रक्षेपित करण्याची कृतीच नव्हे तर संबंध प्रस्थापनेचे शास्त्र आणि कला ठरते. हेच शास्त्र व कला दोन व्यक्ति वा कुटुंबप्रमुख, एखादा गट, वर्ग वा मर्यादित संख्या ओलांडून एकाच वेळी दूरवरच्या वेगवेगळ्या ठिकाणाच्या हजारो लोकांशी संवाद साधण्याच्या वेगवेगळ्या गरजांकरीता वापरले जाते तेव्हा तो संवाद जनसंवाद ठरतो. अशा प्रकारे चित्रपट संवादातून जनसंवाद प्रस्थापित करतो.

कोणताही इतिहास हा मानवाच्या विचार संक्रमणाचा साक्षीदार असतो. निरनिराळ्या शोधाला मानवी बुद्धी कारणीभूत झाली आहे. तसेच 'गरज ही शोधाची जननी आहे' असे म्हणतात. मानव जसजसा विकसीत होत गेला तसा संवाद आणि जनसंवाद साधनेही त्याने त्याच्या अफाट बुद्धिमत्तेद्वारा विकसीत केली.

नवनवीन गरजा निर्माण झाल्याने त्यातून संवाद विकसीत होत गेला आणि संवादातून मानवाचा सांस्कृतिक विकास घडत गेला. हा विकास प्रगत साधनांच्या विकासामुळे झपाट्याने बदलत गेला आहे. बीनतारी यंत्रणेचा शोध, दूरध्वनीचा शोध, नभोवाणीचा

शोध याच बरोबरीने चित्रपटाच्या माध्यमातही वेळोवेळी नवनवे शोध लागत आजच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातल्या प्रगल्भ सिनेतंत्राचा आपण लाभ घेत आहोत.

इलेक्ट्रॉनिक्स व संगणक यांनी तर सारे जगच एखाद्या छोट्या गावासारखे छोटेसे करुन सोडले आहे. प्रथम चित्र मग चलत्‌चित्र, मग मूक चित्र त्यानंतर त्याला ध्वनीची जोड, प्रथम श्वेत-धवल आणि त्यानंतर त्यात रंगाचे युग असे करत करत आजमितीस आपण डिजीटल व डॉल्बी यंत्रणेपर्यंतचा चित्रपटाचा प्रवास इतिहासरुपाने पाहू शकतो.

चित्रपट माध्यम हे समाज व संस्कृतीवर भाष्य करणारे माध्यम आहे. या माध्यमाच्या प्रचंड शक्तिविषयी बोलताना राजकपूर म्हणतात,

**''प्रत्येक माध्यम हे त्या देशाच्या संस्कृतीचे रक्षण आणि प्रसारण करण्याचे काम करत असतात.'' ...२**

चित्रपट माध्यमाच्या शोधापासून ते आजपर्यंत हे माध्यम सतत संक्रमणाच्या वाटेने जात आजच्या आगळ्या वेगळ्या वाटेवर आले आहे. वेळोवेळी या माध्यमातील तांत्रिकता, कलात्मकता तसेच प्रयोगक्षमता आणि जनमानसावरील प्रभाव यात सतत बदल होत गेले, सध्याही ते दिवसगणिक चालू आहेत व भविष्यातही ते चालूच राहणार आहेत. प्रवाही जीवन पद्धतीबरोबर चित्रपट माध्यमाचा प्रवाह आणि प्रभाव हा वाढतच जाणार आहे हे आजपर्यंतच्या ऐतिहासिक वाटचालीचा मागोवा घेताना लक्षात येते.

## ४.२ चित्रपट माध्यमाचा शोध, उगम व विकास.

मानवाने निर्माण केलेल्या महान कलांमधील चित्रपट ही सर्वात तरुण कला आहे. साधारणपणे १८९५-९६ मध्ये जन्म पावलेल्या या आधुनिक कलेनं आता २००९ मध्ये ११५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सिनेमा या कलेला सर्वात तरुण म्हणण्याचं कारण की- संगीत, चित्रकला, नृत्यकला, नाट्यकला यासारख्या कलांचा स्वत:चा हजारो वर्षांचा इतिहास आहे. मानवाच्या असंख्य पिढ्या प्रत्येक पिढीगणिक विकसीत होत गेल्या. त्याचबरोबर या कला हळूहळू विकसीत होत गेल्या; परंतु सिनेमा ही अशी कला आहे की, जी जन्मानंतर झपाट्याने वाढत जाऊन अवघ्या ११५ वर्षांत एका सन्माननीय आणि सर्वव्यापी अशा अवस्थेप्रत ती येऊन पोहोचली आहे. आज तर इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या विकासामुळे तर तिला इतकी गती आली आहे की, जगाच्या कानाकोपऱ्याचा

अंदाज घेतला तर सिनेमा ही कला दिवसा-दिवसांगणिक नवनवे रुप, नवनवे वेष धारण करीत आहे.

एकोणिसाव्या शतकापर्यंत यंत्रशक्तिचा वापर औद्योगिक, लष्करी, घरगुती उपकरणे आणि साधने निर्माण करण्यासाठी होत होता. विसाव्या शतकापासून संज्ञापन क्रांतिचं नवं पर्व उदयाला आलं. संज्ञापनाची बलस्थाने मानवाच्या लक्षात आली. संज्ञापनाची गरज बदलत्या जगाला क्षणोक्षणी जाणवू लागली आणि संज्ञापन क्रांतीने जन्म घेतला. यंत्र म्हणजे कमी श्रमात, कमी वेळेत जास्तीतजास्त काम करुन देणारे साधन. अफाट, अचाट सामर्थ्य, गतिमानता आणि अचूकता तसेच वारंवारिता हा यंत्राचा गुण म्हणूनच संज्ञापनाच्या गतिमानतेसाठी आणि अचूकतेसह इतर गुणांचा वापर करुन मानवाने यंत्रांना संज्ञापन क्रांतिचे शस्त्र आणि शास्त्र बनविले. विसाव्या शतकात माणूस यंत्राचा वापर व्यक्तिगत संज्ञापन व्यवहार आणि कलात्मक अभिव्यक्तिकरीता करायला शिकला.

मानवाने प्रथम संज्ञापनासाठी हावभाव आणि खाणाखुणांची मूक भाषा सुरु केली. त्यानंतर शद्बावर कमी जास्त आघात देत, भावभावनांचं प्रसारण तो शास्त्रशुद्ध बनवत गेला. रेघा, टिंबे, आकृत्या, पाने, फळे, फुले, सूर्यकिरण अशा वेगवेगळ्या चिन्हांनी युक्त अशी त्याने चित्रलिपी तयार केली. त्यातून लिपी सुधारत सुधारत आजच्या प्रगत अवस्थेला पोहोचली. सिनेमातही प्रतिमा आणि प्रतिके हा छाया प्रकाश खेळाचा आलेख लिपीबद्ध करताना चित्रलिपी म्हणजेच सिनेमाची चित्रभाषा तयार होऊ लागली. अशी टप्प्याटप्प्याने उत्क्रांत अवस्था प्राप्त होत गेली.

प्रथम मानवाने हाताने चित्रे काढली. त्यात सुबकपणा, काटेकोरपणा व व्यवस्थितपणा येत गेला.

**वनवासातून आल्यानंतर सीता भिंतीवर निरनिराळी चित्रे काढत असे. असा रामायणात उल्लेख आहे...३**

भिजलेल्या वस्त्रातून पलिकडचे दिसते. शरीरही भिजलेल्या वस्त्रातून दिसते. कागदाला तेल लावल्यावर तो पारदर्शक होतो. या सर्व गोष्टींमुळे चित्रीकरण करता येऊ शकेल का? याचा विचार मानवाच्या मनात घर करु लागला. त्यातच विज्ञानाच्या शोधातून प्रकाश किरण सरळ रेषेत जातात व त्यांना अडथळा आला तरच ते दिसू शकतात या तत्त्वाचा उपयोग करता येईल का? याची विचारचक्रे मानवाच्या मनात पिंगा घालू लागली.

दिव्याचा प्रकाश अडवला तर भिंतीवर सावल्या पडतात. आपण किंवा शरीराचा भाग दिव्याच्या उजेडापुढून हालला तर बाजूला भिंतीवर त्याच्या सावल्या पडतात यातून छाया-प्रकाशाचा खेळ जो आजच्या चित्रीकरणाच्या प्रक्रियेचा आत्मा आहे, त्याचा विचार विचारवंतांच्या, शास्त्रज्ञांच्या मनात फेर धरु लागला.

यातूनच यंत्राचा उपयोग करुन प्रतिमा निर्माण करण्याची कल्पना युरोपात अस्तित्त्वात आली. याविषयी अनिल झणकर लिहितात,

**''सोळाव्या शतकात तिथं 'कॅमेरा' हा शद्ब प्रथम वापरण्यात आला. सुरुवातीला हे यंत्र सूचिछिद्र कॅमेरा (पिनहोल कॅमेरा) या स्वरुपात अस्तित्त्वात होता. हा कॅमेरा म्हणजे एका बाजूला एक सूक्ष्म छिद्र असलेलं पूर्णपणे बंदिस्त असं खोकं होतं. या छिद्रातून आत आलेल्या प्रकाशकिरणांमुळे विरुद्ध बाजूच्या पटलावर समोरच्या दृश्याची प्रतिमा तयार होत असे.'' ...४**

हळूहळू छिद्राच्या जागी भिंगाचा वापर करण्याची कल्पना सुचली. भिंगाचा वापर करताच प्रतिमा आणखी स्वच्छ आणि शुद्ध स्वरुपात दिसू लागली. आता प्रश्न होता या प्रतिमेला टिकाऊपणा देण्याचा. हाही प्रश्न सुटला, सिल्व्हर हलाईडच्या वापराच्या कल्पनेमुळं. यामुळे प्रतिमा टिकाऊ स्वरुपात प्राप्त करण्याचं नवं शास्त्र मानवाला गवसलं.

आजच्या फोटोग्राफीचा पूर्वज म्हणजे स्थिरचित्रण करणारे कॅमेरे आणि त्यांचं स्थिर चित्रण करण्याचं तंत्र. फ्रान्समधील दगेर आणि निपचे यांनी १८३९ साली स्थिर प्रकाश चित्रणाचं (स्टिल फोटोग्राफी) तंत्र विकसीत केलं. गरजा वाढत गेल्या, कल्पना वाढत गेल्या, इच्छा-आकांक्षा वाढत गेल्या आणि निसर्गातले प्राणी, वनस्पती, मानव जसे हालचाल करतात तशी चालती-हालती प्रतिमा मिळविता येईल का? याचा विचार शास्त्रज्ञांना भेडसावू लागला; कारण स्थिर चित्रणात फक्त प्रतिमा मिळे, ती हालली तर हुबेहुब जिवंतपणाचा भास निर्माण होऊन त्यात सजीवता येईल हा ध्यास मानवाने घेतला.

स्थिर चित्र आणि चलत्‌चित्र म्हणजेच कॅमेऱ्याचा निर्जीवतेकडून सजीवतेकडे जाणारा प्रवास. याची सुरुवात एका गंमतीदार प्रसंगातून झाली. साध्या गमती गमतीतूनही थट्टा मस्करीतूनही एखाद्या नव्या शोधाचा जन्म होऊ शकतो हे यावरुन दिसले.

''१८८० च्या सुमाराला फ्रान्समधील मिसोनेर नावाच्या पेंटरने जमिनीपासून चौखूर वर उडालेल्या घोड्याचे चित्र काढले. वास्तविक अशा अवस्थेत घोडा तसा दिसू शकणार

नाही अशी त्याच्या मित्रांनी त्याची थट्टा-मस्करी केली. कॅलिफोर्नियातील मे. ब्रिज ने अनेक कॅमेरे ओळीने लावून एका पळणाऱ्या घोड्याचे फोटो भराभर घेतले होते. मिसोनेरने हे फोटो प्रकाशासमोरून एका गतीने भराभर फिरवून पाहिले तेव्हा घोडा प्रत्यक्ष पळत असल्याचा त्याला भास झाला. हालती चित्रे निर्माण करण्याची कल्पना यातूनच उदयाला आली.

हे असे का होते ? पीटर मार्क रोगेर याने दृष्टीसातत्य (Persistance of Vision) चा शोध लावला. आपल्या दृष्टीपटलावर पडलेली प्रतीमा १/८ ते १/१० सेकंद टिकते ही प्रतिमा शिल्लक असताना ताबडतोब दुसरी, ताबडतोब तिसरी अशा क्रमाने प्रतिमा दृष्टीपटलावर उमटत राहील्या तर दृष्टीसातत्यामुळे चित्र हलत असल्याचा भास निर्माण होतो. हे हलत्या चित्रांचे तत्त्वच चित्रपटात चित्रिकरणासाठी वापरलेले आहे. चित्रपटात सेकंदाला २४ चित्रे आपल्या डोळ्यांपुढून सरकवली जातात.

थॉमस एडिसनने अनेक फोटो भराभर काढणारे यंत्र तयार केले. जॉर्ज ईस्टमन या फोटोग्राफरने लवचिक, पारदर्शक अशी फिल्म (गुंडाळपट्टी) तयार केली. ती या कॅमेऱ्यात बसवून पहिला ओबडधोबड कॅमेरा एडिसनने तयार केला. त्याला किनेटोस्कोप (Kinetoscope) असे त्याने नाव ठेवले.

१८९४ मध्ये वुडहील लॅथॅम याने असे यंत्र तयार केले की, किनेटोस्कोपमधील चित्रे पुढे पडद्यावर दिसतील आणि समोर अनेक लोक बसून ती पाहू शकतील. एका चौकात झालेली बक्षिसाची कुस्ती लॅथॅमने चित्रित केली आणि २० मे, १८९५ साली ती लोकांना दाखविली. प्रोजेक्टरच्या साहाय्याने चलत्‌चित्रांचा पहिला कार्यक्रम ल्यूमेर बंधू आणि थॉमस अर्माट यांनी २३ एप्रिल, १८९६ साली लोकांना दाखवला. पुढे १९०२ साली तीन पायावर उभा राहणारा चित्रपटाचा कॅमेरा थॉमस एडिसन याने तयार केला. यामुळे कॅमेऱ्याला चित्रीकरणाच्या दृष्टीने वेगवेगळ्या दिशेतून हालचाल करता आली.

जॉर्ज मेलिस नावाचा एक जादुगार १९०० च्या सुमाराला हलत्या चित्रांची जादू लोकांना दाखवीत असे. तो एकदा एका धावत्या मोटारीची अशी चित्रे घेताना त्याचा कॅमेरा मध्येच अडखळला. तशाच गडबडीत फिल्म परत मागे ओढून त्याने पुढील चित्रे घेतली. ही चित्रपट्टी रसायनात धुऊन जेव्हा त्याने पडद्यावर पाहिली तेव्हा वर ओढलेल्या फिल्मवर एकात दुसरी हालचाल बेमालूम मिसळली होती असे त्याला दिसले. त्यातून

चित्रात चित्र मिसळण्याच्या कलेचा शोध लागला. मेलीसने मग कोणत्या घटना एकमेकात मिसळाव्या हे कळावे म्हणून क्रमवारीने कागदावर उतरून काढल्या. त्यातून चित्रपटकथा लिहिण्याचे तंत्र निर्माण होत गेले हाच पहिला 'सिनॅरिओ' म्हणता येईल. यानेच पुढे 'सिंड्रेला' नावाचा चार मिनिटांचा चित्रपट तयार केला. या सिंड्रेलामध्ये त्याने नट भाड्याने घेतले होते. तसेच नकली इमारत आणि दिवाणखानेही उभारले होते.

१९०३ मध्ये एडविन पोर्टर याने चित्रपट्ट्या कमी अधिक प्रमाणात कापून त्यांची काही विशिष्ट रचना केली तर प्रेक्षकांच्यावर त्याचा वेगळाच परिणाम होतो हे दाखविले. थोडक्यात संकलनाचे प्रात्यक्षिकच त्याच्या 'अमेरिकेतील फायरमनचे जीवन' आणि 'रेल्वेतील दरवडा' या दोन लहान चित्रपटांद्वारे लोकांना दिसले.

डेव्हीड ग्रिफीथ याने प्रथमच धंदेवाईक नटनट्यांना कामावर घेतले. क्लोजअपची कल्पना त्याचीच. १८५७ साली फुनोटोग्राफ नावाचे ध्वनिमुद्रण करणारे यंत्र फ्रान्समध्ये तयार झाले. १८७७ मध्ये एडिसनने गोल तबकडी आणि वर कर्णा असलेला फोनोग्राफ बनविला. पूर्वी मॅजिक लँटर्नने चित्रे दाखविताना सोबतच फोनोग्राफरवर त्याचे वर्णन होत असे. १९०८ साली सिनेफोन आला. प्रथम सर्व ध्वनीमुद्रग करून नंतर त्याबरहुकूम चित्रीकरण करत असत. पुढे ध्वनीचा फोटो घेण्याचा शोध लागला व चित्रपटाचा बोलपट झाला.

## ४.३ मूकपटाचा जमाना (१९१३-१९३१)

प्रत्यक्षात चित्रपट या कलेनं पडदा पाहिला तो १८७५ साली. १८९५ ते १९०५ या दशकात चित्रपटकला बाल्यावस्थेत होती. पडद्यावर चित्रे दिसणे, इतर गोष्टींच्या आधारे काल्पनिक वातावरणनिर्मिती करणे यातच त्यावेळच्या प्रेक्षकांना रुचि वाटत होती. तथापी आणखी काही हवं, काहीतरी कमी पडतंय याचीही रुखरुख लागली होती. ज्याचा परिणाम म्हणून १९०५ नंतर या माध्यमानं जागतिक सिनेमा क्षेत्रात जोरदार प्रगतीची दालने पार करायला सुरुवात केली.

सिनेमा म्हणजे चित्रपट हा छायाप्रकाशाचा खेळ, पण हळूहळू या खेळाचं रुपांतर नव्या माध्यमात होऊ लागलं आणि साहजिकच त्याच्यात व्यावसायिकतेची अंगेही येऊ लागली.

अमेरिकेत हॉलीवुड येथे वेगळी चित्रपटाची नगरी आकार घेऊ लागली. तेथे डेव्हीड वॉर्क ग्रिफिथ ह्या दिग्दर्शकाचा उदय झाला आणि भारतीय चित्रपटाचे आद्यजनक श्री. धुंडीराज गोविंद फाळके उर्फ दादासाहेब फाळके यांनी भारतीय चित्रपटाची मुहूर्तमेढ रोवली.

अमेरिकेत ग्रिफीथ चित्रणतंत्रात आणि कलेत वेगवेगळे प्रयोग करीत होता. त्याने संकलनाच्या तंत्रात आमुलाग्र क्रांती केली आणि त्याकाळच्या जमान्यातल्या लोकांना आश्चर्यचकीत आणि मंत्रमुग्ध करुन सोडले.

याच समकाळात भारतात तंबुमध्ये चित्रपट दाखविण्याचे कार्यक्रम सुरु झाले होते. त्यांनाच त्या काळी 'पिक्चर पॅलेस' असे नामाभिधान होते. अर्थातच या तंबूत दाखविले जाणारे सारे चित्रपट विदेशीच असत कारण त्या काळापर्यंत भारतात चित्रपट निर्मितीचा श्रीगणेशा झाला नव्हता.

२८ डिसेंबर १८८५ रोजी ल्युमिएर बंधूंनी 'सिनेमातोग्राफ'चं प्रथम प्रात्यक्षिक पॅरिसमधील कॅफे ग्रँडमध्ये केलं. स्थानकात शिरणारी आगगाडी वगैरे अशी चलत्‌चित्रे त्यांनी दाखवली.

७ जुलै, १८९६ ला ल्युमियेर बंधूंनी मुंबईतल्या वॉटसन हॉटेलात आपल्या चित्राचं प्रदर्शन केलं. याच्या पहिल्याच खेळाला हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर उर्फ सावेदादा हजर होते. ते त्यावेळचे नावाजलेले स्थिर प्रकाश चित्रकार (स्टिल फोटोग्राफर) होते. प्रभावित झालेल्या सावेदादांनी हे तंत्र शिकून घेतलं व भारतातला पहिला कॅमेरा त्यांनी लंडनहून आयात केला. अनेक चित्रीकरणांपैकी त्यांनी एका कुस्तीचं चित्रीकरण आणि रँग्लर परांजपे यांचा १९०१ चा सत्कार ही महत्त्वाची चित्रीकरणे करुन दाखविली. आजची तांत्रिकता त्यावेळी अजिबात नव्हती. फक्त एकापुढे जोडलेली अशी एकेक चित्रं की झाला चित्रपट तयार. सावेदादांपासून स्फूर्ती घेऊन अशा प्रकारची चित्रनिर्मिती मग भारतात अनेकांनी केली. त्यात नेहमीच्या जीवनातल्या अगदी साध्या साध्या घटनांचं चित्रीकरण असायचं.

अत्यंत महत्वाचा योगायोग म्हणजे या 'पिक्चर पॅलेस' मध्ये एका भारतीय जिगरबाज तरुणाने एक चित्रपट पाहिला. ज्याचं नाव होतं, 'ख्रिस्ताचं जीवन.' हा चित्रपट पाहून हे तरुण गृहस्थ म्हणजेच दादासाहेब फाळके फारच प्रभावित झाले. त्याचं वर्णन त्यांनी

असं केलंय- -

**''इ.स. १९१० मध्ये... ख्रिस्त चरित्र पाहत असताना ख्रिस्त या व्यक्तिविषयी अंत:करणातील पूज्य भाव दृढ होत असताना... माझ्या अंत:करणात त्या दिवशी काहीतरी चमत्कारीत होऊ लागले होते... चर्मचक्षुपुढून येशू ख्रिस्त भराभर जात असता त्याच जागी भगवान श्रीकृष्ण, भगवान रामचंद्र, त्यांची गोकूळ, अयोध्या ही नगरे गोचर होत होती... आम्हा भारतपुत्रास आमची भारत चित्रे पडद्यावर कधी दृष्टीस पडतील काय? सर्व रात्र या विवंचनेत गेली.''...५**

दादासाहेबांनी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये चित्रकला व स्थिर प्रकाश चित्रणाचा अभ्यास केला होता. त्यांना नाटक व जादूची कलाही अवगत होती. नवनवीन विद्या आणि तंत्र आत्मसात करायची आवड, जिद्द आणि महत्त्वाकांक्षा असणारे हे गृहस्थ होते.

त्यांनी आपला पहिला सव्वा मिनिट लांबीचा 'रोपट्याची वाढ' चित्रपट बनवला. यासाठी त्यांनी अतोनात कष्ट उपसले. अगदी डोळ्यांची क्षमताही क्षीण झाली तरी पर्वा केली नाही. हे पाहून मुंबईच्या यशवंतराव नाडकर्णींनी त्यांना 'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटासाठी भांडवल देण्याचं मान्य केलं. १९१३ साली हा चित्रपट मुंबईला 'कॉरोनेशन' या चित्रगृहात दाखवला गेला. तेव्हा प्रेक्षकांनी अक्षरश: हा चित्रपट डोक्यावर घेतला. या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन, संकलन, नेपथ्य इ. सबकुछ दादासाहेब होते. चित्रपटातील पहिली स्त्री भूमिका 'तारामती' ही हॉटेलमधील वेटर आण्णा साळुंखे यांनी केली कारण त्यावेळी स्त्रीया... वेश्यासुद्धा चित्रपटात काम करायला तयार झाल्या नाहीत. फाळके यांनी लोकांच्या श्रद्धा जाणून धार्मिक चित्रपट बनवले. खऱ्या अर्थाने त्यांनी भारतीय चित्रपटांचा श्रीगणेशा केला. कथानक असलेला व सतत जवळजवळ तासभर चालणारा चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' हाच होय; कारण तसे छोटे-मोठे प्रसंगाचे चित्रीकरण करुन त्या चित्रीकरणाच्या तुकड्यांना चित्रपट म्हणण्याचा तो जमाना होता.

महाराष्ट्रात श्री. दादा तोरणे, दादा सावे, श्री. नाना चित्रे, कलकत्त्यामध्ये श्री. हिरालाल सेन व ज्योतीष सरकार इ. नी चित्रपट निर्मिती केली होती. श्री. दादासाहेब तोरणे यांनी १९०९ साली 'भक्त पुंडलिक' हा चित्रपट बनविला. श्री. हिरालाल सेन यांनी सन १९००

मध्ये 'अलीबाबा' हा चित्रपट व त्यानंतर 'दिल्ली दरबार' चित्रित केला होता. श्री. संपत यांनी १९१२ साली 'सावित्री' निर्माण केला. १८९९ साली सावे दादा यांनी 'मॅन अँड द मन्कि' प्रकाशित केला.

१९२९ साली कोल्हापुरात प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. व्ही. शांताराम, फत्तेलाल, दामले, धायबर व कुलकर्णी हे चौघे प्रभातचे भागिदार होते. त्यांनी गोपाळकृष्ण, चंद्रसेना, बजरबट्टू इ. चित्रपट सादर केले. रणजित फिल्म कंपनीने 'पती पत्नी' निर्माण केला. पुढे त्यांनी जवळवळ ३६ मूकपट सादर केले. रसीली राधा, मधुर मोहीनी, जीवन का जादू, सिंहल द्विपकी पेटी इ. प्रमुख होत. प्रभातच्या व्ही. शांताराम दिग्दर्शित 'स्वराज्य तोरण' वर सरकारने बंदी आणली. त्यात बदल व काटछाट करुन 'उदयकाल' तयार केला.

महाराष्ट्र फिल्म कंपनीने वत्सला-हरण, सुरेखा, अभिमन्यु, सिंहगड, कल्याण खजिना, सावकारी पाश, प्रेमसंगम, मार्कंण्डेय, भक्त दामाजी, बाजीप्रभू देशपांडे, महारथी कर्ण, लंकादहन, दुष्मन की रीत, मुरलीवाला, बाज बहादूर, किस्मत इ. चित्रपट निर्माण केले. याशिवाय युनायटेड सिंडीकेट, आर्यन फिल्म कंपनी, भारत फिल्म कंपनी इ. मार्फतही अनेक चित्रपट निर्माण झाले.

त्या जमान्यातील गाजलेले कलावंत म्हणजे- श्रीमती कमलाबाई गोखले, गणपत बकरे, भाऊराव दातार, पी. जयराज, मा. विठ्ठल, झुबेदा, झेबुन्निसा, पृथ्वीराज, माधुरी, गोहर, सुलोचना इ.

त्या काळातील कलावंतांना खूप मेहनत करावी लागत असे. बोलपट नव्हते, मूकपट होते तेव्हा आडदांड शरीराचे कलावंत घेतले जात. पडद्यावर चित्रे दाखवली जात असताना समोर पेटी, तबलावाले बसून विविध प्रकारचे आवाज काढून कथानकात रंगत भरली जायची.

## ४.४ बोलपटाचा जमाना आणि मराठी चित्रपट

सुरुवातीला नुसती चित्रे पडद्यावर प्रदर्शित होत. त्यानंतर हालती चित्रे आणि मग आवाजाची दुनिया असा क्रम आढळून येतो.

मूकपटाच्या काळात सगळा एकसंघपणा किंवा वसुधैव कुटुंबकम् अशी अवस्था

होती कारण मूकपट म्हणजे प्रांत, भाषा या सर्वांपासून अलग असा एकजिनसीपणा दाखवला जाणारा मूकपट हा भाषा आणि प्रांत या पलीकडे जाऊन सर्व रसिकांसाठी अविष्कार वाटत होता. Sub titles म्हणजे चित्रांच्या खाली त्या त्या भाषेतील पाट्या वापरण्याचा प्रघात होता. कृत्रिम आवाज काढणारे विविध साहित्य आणि वाद्यवृंद यांच्या सहाय्याने चित्रपटात सजीवपणा ओतण्याचा प्रयत्न करीत होते.

चित्रपटाला ध्वनी आला आणि या रसीकमान्य कलाकृतींमध्ये भाषेच्या भिंती उभ्या राहिल्या; कारण आवाजामुळे मराठी, हिंदी, कन्नड तसेच इंग्लीश, जपानी, रशियन, फ्रेंच असे भाषिक चित्रपट निर्मिती सुरु झाली.

गंमत म्हणजे सुरुवातीला लोकांना भाषेचं (आवाजाचं) अप्रुपच वाटलं नाही. किंबहुना पूर्वीचा मूकपटच बरा असा म्हणणारा एक वर्गही काही कालापुरता दिसून आला.

भारतापुरता विचार करावयाचा झाल्यास १४ मार्च, १९३१ ला मुंबईतील मॅजेस्टिक सिनेमामध्ये प्रदर्शित झालेला 'आलम आरा' हा पहिला भारतीय दृक्-श्राव्य माध्यमातील चित्रपट असे म्हणता येईल.

ध्वनीची साथ मिळाल्यावर वेगवेगळे आशय रसीकांपर्यंत त्यांच्या त्यांच्या भाषेत पोहचविणे सोपे झाले. विविध सामाजिक प्रश्नांना अधिक स्पष्ट आणि भौगोलिकता प्राप्त झाली.

याबाबतीत डॉ. अनिल संपकाळ म्हणतात,

**''१९३२ च्या 'आलम आरा' या पहिल्या ध्वनी संवादाचा वापर असलेल्या चित्रपटापासून शद्ब हे चित्रपटाचे महत्त्वाचे अंग बनले. मूकपटात (सब-टायटल्सच्या स्वरुपात) शद्बयोजना असूनही शद्ब कुठेही मूकपटावर अधिपत्य गाजवू शकला नाही, परंतु तंत्र माध्यमातील विकासामुळे चित्रपटाला जी वाणी प्राप्त झाली, त्यामुळे सुरुवातीला निर्माण झालेले बोलपट हे अधिकांश नाटकांचे चित्रण वा नाटकसदृष्य होते.'' ...६**

बोलपट युग 'आलम आरा' मुळे भारतात सुरु झाले. त्याच्या परिणामाविषयी डॉ. अनिल संपकाळ पुढीलप्रमाणे वर्णन करतात,

**''गीतसंगीत यांच्याबरोबर चित्रपटातील पात्रे बोलू लागली अन् भारतातील अडाणी, अशिक्षित प्रेक्षकांशी चित्रपट अधिक संवाद साधू लागला.'' ...७**

चित्रपट हे कॅमेऱ्याचे माध्यम आहे. कॅमेरा बोलला पाहिजे हे खरे आहे. आशय जास्त स्पष्ट करण्यासाठी पूर्वी सूचक सब टायटल्स वापरणे अपरिहार्य होते; परंतु मुख्य अडचण निरक्षरांची होती. त्यांना पाट्या वाचायला येत नसल्याने आशय स्पष्ट होणे अवघड व्हायचे. चित्राला ध्वनीची जोड मिळाली आणि साक्षर आणि निरक्षर हे एकाच पातळीवर येऊन चित्रपटकलेचा आस्वाद घेऊ लागले. अर्थातच मूकपटांचे महत्त्व दिवसेंदिवस कमी कमी होऊन ते फक्त इतिहास रुपातच राहू लागले.

मास्टर आणि कंपनीचा 'संत तुकाराम' उर्फ जयहरी विठ्ठल दि. ३० जानेवारी, १९३२ रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमात प्रदर्शित झाला. राजापूरकर नाटक मंडळींचे 'संत तुकाराम' नाटक फारच लोकप्रिय झाले होते. त्यावरुनच हा चित्रपट बेतण्यात आला. हळूहळू चित्रपट गर्दी खेचू लागला. संत तुकारामांच्या भूमिकेत विष्णुपंत पागनीस खूपच लोकप्रिय झाले. इतके की विष्णुपंत पागनीस म्हणजेच संत तुकाराम हे समीकरण रुढ झाले.

याचवेळी प्रभात फिल्म कंपनीने आपले स्थलांतर पुणे येथे केले होते. प्रभातने 'अयोध्येचा राजा' हा बोलपट तयार केला आणि तो ६ फेब्रुवारी, १९३२ रोजी मुंबईच्या मॅजेस्टिक टॉकीजमध्ये प्रदर्शित केला.

मूकपटांना आवाज प्राप्त होताच अनेक प्रकारे रसीकांमध्ये खळबळी निर्माण झाल्या; कारण प्रथम पडद्यावर दिसणाऱ्या चित्रांमुळे प्रेक्षक आकृष्ट झाले होते त्यानंतर बराच काळ उलटला आणि चित्रे हालू शकतात, सजीवांप्रमाणे हालचालही करु शकतात, हावभाव करु शकतात... सुख-दु:ख, तृप्ती अशा भावभावनांनी रसीकांना मोहिनी घालू शकतात. या सर्वांचा परिणाम समाज मनावर झाला; परंतु हालचाल करणारी पडद्यावरील चित्रे शद्बांतूनही भावना व्यक्त करु शकतात याचा संमिश्र परिणाम त्यावेळेच्या समाजमनावर दिसून आला. एक तर मूकपटाच्या पगड्यातून बाहेर पडून नव्या अनुभूतीला सामोरे जाणे त्यांना अवघड जात होते तर दुसरे म्हणजे हालचाल आणि बोलणे म्हणजे १००% मानवी अविष्कार यांनी ते मोहीतसुद्धा होऊन गेले होते. या परिणामांवर भाष्य करतांना वसंत साठे म्हणतात,

**''मूकपटाला आवाज मिळाला तेव्हा एका बाजूला प्रेक्षकांकडून अचंबा व्यक्त झाला आणि त्यांच्याकडून मिळणाऱ्या आश्चर्यमिश्रीत कौतुकाच्या लाटेत, दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञांकडून त्याचा अमर्याद, बेहिशोबी वापर सुरु झाला मग**

**अवतरले शांताराम आणि देवकी बोस. चित्राला ध्वनीची जोड दिल्यामुळे हे माध्यम जीवनाच्या अधिक जवळ येतं आणि रंगभूमीच्या भासमान दुनियेपासून दूर जातं हे या दोन महान दिग्दर्शकांनी नेमकं ओळखलं.'' ...८**

त्याकाळी संगीत नाटकांचा जनमनावर परिणाम होता. अवघ्या सांस्कृतिक जीवनावर पौराणिक गोष्टींचे अधिराज्य होते आणि याच कारणामुळे पौराणिक विषय नाटकांतून हाताळले जात होते व ते जनमनाची पकडही घेत होते. चित्रपट ज्यावेळी बोलू शकत नव्हते त्या काळी चित्र पाहून कथा ओळखता यावी यासाठी पौराणिक आणि ऐतिहासिक विषय उपयुक्त ठरले. कारण यातील कथा सर्वसामान्यांना निव्वळ माहितीच होत्या असे नव्हे तर त्यांनी जनतेत एक आदराचे आणि श्रद्धेचे स्थान मिळविले होते. या कथा व त्यांचा परिणाम हा समाजावरील एक अविभाज्य असा प्रभाव होता. त्यामुळे बोलपटाच्या प्रारंभिक अवस्थेतही पौराणिक आणि ऐतिहासिक विषय हाच चित्रपटांचा, बोलपटांचा मुख्य गाभा होता. हेच विषय नाटक, संगीत नाटक यातून त्याकाळी लोकप्रिय झाले होते आणि म्हणूनच नाटके, संगीत नाटके यासर्वांचा अनन्य साधारण असा प्रभाव त्याकाळच्या बोलपटांवर सर्रास दिसून येतो. कमी अधिक प्रमाणांत आजही हाच प्रभाव दिसून येतो.

नाटकांना दृक्‌श्राव्य स्वरुप होते; परंतु मूकपटांना फक्त दृष्यस्वरुपच होते. या श्राव्य स्वरुपाच्या अभावामुळे नाटकाचे पारडे सर्वश्रेष्ठतेकडे झुकत होते. दृष्यपातळीवरील आणि श्राव्य पातळीवरील या दोन्ही पातळीवरील अनुभवांची पातळी एकत्रीत होऊन नाटके जीवनानुभवाच्या जवळ जात होती परंतु ध्वनीची जोड लाभताच बोलपटाचे पारडे नाटकापेक्षा जड होताना प्रत्ययास आले.

याबाबतीत डॉ. अनिल संपकाळ लिहीतात,

**''मराठी भाषेत सुरु झालेली चित्रपटनिर्मिती तत्कालीन सांस्कृतिक परंपरा घेऊन प्रवास करु लागली. संगीत नाटकांच्या प्रभावातून चित्रपटांनी गीत-संगीत स्विकारले. मूकपटाच्या जमान्यात प्रेक्षकप्रिय असणारे विषय उदा. पौराणिक, ऐतिहासिक अथवा संतमहंत चरित्र आदी बोलपट निर्मात्यांनी स्वीकारले... गीत, संगीत, संवाद यावर नाटकांची छाप दिसू लागली. चित्रपट फक्त बोलपट म्हणून अस्तित्त्वात उरले.'' ...९**

मूकपटाचा बोलपट झाला आणि मग बोलपटांना सामाजिक प्रतिष्ठा आणि कलेचा दर्जा प्राप्त झाला. साहजिकच हा परिणाम दृक्-श्राव्य या दोन्ही स्वरुपांच्या वरदांनामुळे दिसून आला. नाटकापेक्षा बोलपट काकणभर सरस ठरु लागला. या वेळेपर्यंत कुलीन स्त्रिया रंगभूमीवरही काम करत नव्हत्या. दुर्गा खोटे यांनी प्रथम बोलपटात धाडसी पदार्पण केले.

अयोध्येचा राजानंतर भालजी पेंढारकर दिग्दर्शित आणि लिखीत 'श्यामसुंदर' बोलपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाने रौप्य महोत्सव साजरा केला. मराठी निर्मात्यांनी बोलपटयुगात द्विभाषासूत्र स्विकारले. मराठी व हिंदीत त्यांनी बोलपट निर्माण केले. यांना त्यावेळी 'डबल वर्जन' असे म्हणत. यानंतर प्रभातची एक-एक अशी चित्रपरंपरा धुमधडाक्यात सुरु झाली. 'माया मच्छिंद्र,' 'अग्नीकंकण' तसेच 'सिंहगड' हे प्रभातचे बोलपट गाजू लागले. बाळासाहेब यादवांनी 'कुरुक्षेत्र' व 'मराठ्यांची दूही' ही दोन चित्रे काढली. बाळासाहेब सरपोतदारांनी रुक्मिणीहरण चित्रपट काढला. १९३२ मध्ये संत सखूबाई आला.

ध्वनीच्या आगमनाने नाटकांच्यावर परिणाम झाला. नाटकाचा प्रेक्षकवर्ग घटला. रंगभूमीवरचे नट, दिग्दर्शक, लेखक बोलपटांमध्ये आले त्यामुळे मराठी चित्रपटांना नाटकांप्रमाणेच एक वेगळे वजन, वेगळा दर्जा प्राप्त झाला. 'अमृतमंथन' या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी प्रथमच झूम लेन्सचा वापर केला. तो अत्यंत प्रभावी ठरला.

बाबूराव व विनायक यांनी 'विलासी ईश्वर' पहिला मराठी सामाजिक बोलपट काढला. भट बेडेकर प्रॉडक्शनने 'ठकीचे लग्न' सादर केला. मराठी विनोदी चित्रपट काढण्याचा पहिला मान त्यामुळे विश्राम बेडेकर यांना जातो. १९३५ मध्ये शांतारामांनी एकनाथांच्या जीवनावर 'धर्मात्मा' काढला. मूळ नाव 'महात्मा' होते. अस्पृश्यतेच्या समस्येवर हा आधारित होता पण सेन्सॉर बोर्डाच्या आक्षेपाला तोंड द्यावे लागल्याने नावात बदल करुन 'धर्मात्मा' नाव ठेवावे लागले. भालजी पेंढारकरांनी 'पार्थकुमार' व 'कालीया दर्शन' हे प्रसिद्ध बोलपट निर्माण केले. यानंतर छाया, सावकारी पाश व तुकाराम हे बोलपट आले.

'तुकाराम' चित्रपट प्रभातसाठी दामले, फत्तेलाल यांनी दिग्दर्शित केला. व्हेनिस चित्रपट महोत्सवात या चित्रपटाची खूप प्रशंसा झाली.

प्रभातने एकापेक्षा एक असे सरस, सामाजिक आशयाला धरुन चित्रपट दिले. 'कुंकू'- जरठबाला विवाह या विषयावरचा बोलपट खूप गाजला. यानंतर प्रेम म्हणजेच सर्वस्व नव्हे असा तरुणाईला संदेश देणारा 'माणूस' बोलपट शांतारामांनी दिग्दर्शित केला १९३९ मध्ये. १९४१ मध्ये 'शेजारी' हा हिंदू-मुस्लिम ऐक्याविषयीचा चित्रपट शांतारामांनी दिग्दर्शित केला. यातील धरण फुटण्याचा देखावा हा ट्रिक फोटोग्राफीचा प्रकार खूपच वाखाणला गेला. यानंतर गोपालकृष्ण, संत ज्ञानेश्वर असे एकापेक्षा एक सरस बोलपट प्रभातने दिले.

याच काळात मा. विनायकांनी सामाजिक, उपहासात्मक, विडंबनात्मक, विनोदी चित्रपटांची निर्मिती केली. 'धर्मवीर' आणि 'प्रेमवीर' हे दोन्ही चित्रपट गाजले. यानंतरचा 'ज्वाला' कोसळला पण हंसच्या 'ब्रह्मचारी' ने खूप यश मिळविले. अत्रे-विनायक जोडी जमली. त्यांनी मग 'ब्रॅण्डीची बाटली' व 'अर्धांगी' ही दोन चित्रे सादर केली.

अत्रे विनायक जोडीने मराठीमध्ये विनोदी चित्रपटांची पायाभरणी केली. या संदर्भात वसंत साठे म्हणतात,

**''विनोदी चित्रपटांना प्रसिद्धी मिळवून दिली. विनोदी चित्रपटांची मराठीत परंपराच निर्माण झाली नि आजही चालू आहे. इतर भाषिक चित्रपटांहून मराठीतील विनोदी चित्रपट वेगळा व समृद्ध आहे.'' ...१०**

यानंतर आचार्य अत्रे यांनी 'पायाची दासी' हा लोकप्रिय चित्रपट दिला. व्ही. शांताराम यांनी राजकमल स्टुडिओ स्थापन करुन 'सावता माळी' इ. चित्रपट निर्माण केले. प्रभातने नंतर संत सखू, दहा वाजता व रामशास्त्री हे चित्रपट निर्माण केले.

यानंतर विजय भट्ट यांनी 'भरतभेट' व 'रामराज्य' हे दोन चित्रपट निर्माण केले. शांतारामांनी पहिला शाहीरी मराठी चित्रपट 'लोकशाहीर रामजोशी' निर्माण केला. याचवेळी मंगल पिक्चर्सने पहिला मराठी ग्रामीण बोलपट 'जय मल्हार' निर्माण केला. या दोन्ही चित्रपटांनी एक ग्रामीण चित्रपटांचा आणि तमाशापटांचा नवा यशस्वी पायंडा मराठीत सुरु झाला. याविषयी साठे म्हणतात,

**''या दोन्ही चित्रपटांत महाराष्ट्राचे लोकसंगीत, लावणी व लोकनृत्य तमाशा रुपेरी पडद्यावर आले. दोन्ही चित्रपटांना अफाट यश मिळाले. कथा आणि संगीत ग्रामीण जीवनातील असल्याने खेड्यांतून शहरात आलेला औद्योगिक कामगार**

**आणि खेड्यातला शेतकरी हा नवा प्रेक्षक मराठी चित्रपटांकडे आकर्षित झाला. त्या तुलनेने युद्धापूर्वीचा सुशिक्षित कनिष्ठ मध्यमवर्गीय काहीसा कमी होऊ लागला.'' ...११**

या चित्रपटांचा फार मोठा परिणाम आणि पगडा जनमनावर बसला याविषयी वसंत साठे पुढे म्हणतात,

**'''रामजोशी व 'जयमल्हार' यांनी मराठी चित्रपटांना नवे वळण दिले ते पुढे २५ वर्षे टिकले. पहिली गोष्ट म्हणजे संगीत. लावणीप्रधान संगीताचा पायंडा पुढे अनेक वर्षे रुळला. तो १९४७ मध्ये जेवढा लोकप्रिय ठरला तेवढाच पुढेही गाव, पाटील व ग्रामीण वातावरण आणि चाळ ढोलकी पुढे दोन तपे मराठीत दुमदुमत राहीली.'' ...१२**

याच चित्रपटांमुळे कथा-पटकथा, संवाद, गीते लिहिणारा चतुरस्त्र व प्रतिभावान समर्थ लेखक ग. दि. माडगूळकर रसीकजनांना मिळाला.

यानंतर शांतारामांनी 'अमर भूपाळी' हा अमर चित्रपट तयार केला. याने बंगालसारख्या परप्रांतातसुद्धा विक्रमी गर्दी केली. याची पटकथा विश्राम बेडेकर यांनी लिहीली होती. यानंतर अत्रे पिक्चर्सचे 'महात्मा फुले' व 'श्यामची आई' चित्रपट आले. १९५१ मध्ये श्यामच्या आईने केंद्र सरकारचे सुवर्णपदक पटकावले. महात्मा फुलेनेही राष्ट्रपती रौप्यपदक मिळविले.

यानंतर भालजींचा 'मीठभाकर' चित्रपट गाजला. यानंतर त्यांनी जयभवानी, शिलंगणाचे सोने, मी दारु सोडली, छत्रपती शिवाजी, पावनखिंड, गाठ पडली ठका ठका, येसूबाई, नायकिणीचा सज्जा, आकाशगंगा, मराठा तितुका मेळवावा इ. चित्रपट निर्माण केले.

यानंतर राजा परांजपे यांनी 'पेडगावचे शहाणे' हा विनोदी चित्रपट दिग्दर्शित केला. त्यानंतर त्यांच्या 'लाखाची गोष्ट'नेही नाव आणि यश मिळविले. मंगल पिक्चर्ससाठी राम गबाले यांनी मोठी माणसं, देव पावला, मायबाप, जशास तसे, घरधनी, नरवीर तानाजी इ. चित्रपट दिग्दर्शित केले.

१९५८ मध्ये शिंदे बंधूंचा 'दोन घडीचा डाव' यशस्वी ठरला नंतर अनंत मानेंच्या 'सांगत्ये ऐका' ने यशाचा वेगळाच मानदंड निर्माण केला. हा चित्रपट पुण्याच्या आर्यन

चित्रपटगृहात सलग १३२ आठवडे गर्दी खेचत राहीला. यानंतर माधव शिंदे दिग्दर्शित कन्यादान व माणसाला पंख असतात हे चित्रपट गाजले. अनंत मानेंनी अनेक यशस्वी चित्रपट दिले.

१९६२ सालची महाराष्ट्र सरकारची प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके अनुक्रमे- प्रपंच, सुवासिनी आणि शाहीर परशुराम या चित्रपटांनी मिळविली. अशोक मानेंचा 'एक गाव बारा भानगडी' चित्रपटही गाजला.

राजा ठाकूर यांनी मुंबईतील जागा टंचाई विषय घेऊन विनोदी व उपरोधिक 'मुंबईचा जावई' हा यशस्वी चित्रपट दिला. त्यांचाच 'एकटी' ही खूप गाजला. कमलाकर तोरणे यांनी 'आम्ही जातो आमुच्या गावा,' 'भिंतीला कान असतात,' 'गरीबाघरची लेक' असे यशस्वी चित्रपट दिग्दर्शित केले.

यानंतरची यशस्वी चित्रे म्हणजे- 'पवनाकाठचा धोंडी,' 'साधी माणसं,' 'मोलकरीण,' 'मानीनी,' 'थोरातांची कमळा' इ. होत.

यानंतर दादा कोंडके यांचा झंझावात सुरु झाला. सोंगाड्याच्या अभुतपूर्व यशानंतर पुढच्या दहा वर्षांत सलग आठ रौप्यमहोत्सवी चित्रपट निर्माण करुन त्यांनी हिंदीलाही स्पर्धा आणि दहशत निर्माण केली.

हा ओघवता परामर्श १९३२ ते १९७२ पर्यंतच्या मराठी बोलपटांचा होता. इथून पुढे चित्रपट रंगीत होऊ लागला.

### ४.५ रंगांचा जमाना आणि मराठी चित्रपट

चित्रपटात रंग भरायचा प्रयत्न खऱ्या अर्थाने व्ही. शांताराम यांनी केला, पण पहिले त्यांचे प्रयत्न 'सैरंध्री' वगैरे पूर्ण अपयशी ठरले. १९७२ साली त्यांनी निर्माण केलेला 'पिंजरा' हा पहिला रंगीत मराठी चित्रपट.

१९७५ मध्ये महाराष्ट्र शासनाने कर परतीची योजना जाहीर केली आणि अंमलातही आणली. मराठी चित्रपट निर्माते दिग्दर्शक उत्साहाने कामाला लागले. चित्रपट निर्मितीची संख्या आणि गती वाढू लागली. नवनवे कलाकार, दिग्दर्शक उदयाला आले.

जब्बार पटेलांचा श्वेत-धवल 'सामना' १९७५ मध्ये गाजला. बर्लीनच्या आंतरराष्ट्रीय महोत्सवात तो वाखाणला गेला. यानंतर त्यांचे 'जैत रे जैत', 'सिंहासन' हे चित्रपट

गाजले. त्यांचाच 'उंबरठा'ही गाजला. व्ही. शांतारामांनी 'चानी' चित्रपट रंजनाला घेऊन काढला.

मानवत हत्या कांडावर आधारीत 'आक्रित' चित्रपट अमोल पालेकर आणि चित्रा पालेकर यांनी काढला तर राजदत्त यांनी 'शापित' दिग्दर्शित केला.

या काळातील खूप चांगले प्रयत्न अयशस्वी ठरले आणि मग नव्या दमाच्या सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांनी विनोदांचा आधार घेऊन मराठी चित्रपटांत यशस्वी चित्रपट निर्माण केले.

सचिनने- 'गोंधळात गोंधळ,' 'नवरी मिळे नवऱ्याला,' 'गम्मत-जम्मत,' 'अशी ही बनवाबनवी,' 'आत्मविश्वास,' 'एकापेक्षा एक' अशी आदर्श चित्रे निर्माण केली तर महेश कोठारे याने 'धूमधडाका,' 'दे दणादण,' 'थरथराट,' 'धडाकेबाज' असे यशस्वी चित्रपट निर्माण केले.

संकलक एन्.एस्.वैद्य यांनी 'लेक चालली सासरला' हा चित्रपट दिग्दर्शित केला. हा चित्रपट आणि राजदत्त दिग्दर्शित 'पुढचं पाऊल' हुंडाबळीच्या समस्येवर आधारीत होता. पुरुषोत्तम बेर्डे दिग्दर्शित व निर्मित 'हमाल दे धमाल' हा चित्रपटही रसिकमान्यता मिळवून गेला.

बहुरुपी, ठिणगी, माळावरचं फूल, नवऱ्यानं सोडली, पूर्णसत्य, सत्त्वपरीक्षा, बाप रे बाप, देवाशप्पथ खरं सांगेन, पैज लग्नाची, डाळींबी, एक डाव भुताचा, सरकारनामा, घरसंसार, जय सप्तशृंगी माता, नवसाचं पोर, तू तिथं मी, वहिनीची माया, सौभाग्य, सासर माझं भाग्याचं, रंग प्रेमाचा, बिनधास्त, घे भरारी, सवाई हवालदार, कर्मयोग, घराबाहेर, धांगडधिंगा, पाठराखीण, प्रतिडाव, निर्मला मच्छिंद्र कांबळे, तोचि एक समर्थ असे अनेक रंगीत चित्रपट निर्माण झाले.

### ४.६ नव्या सहस्त्रकातील मराठी चित्रपट

मराठी चित्रपटसृष्टीच्या आजपर्यंतच्या इतिहासात डोकावताना एक गोष्ट प्रकर्षाने दिसते की, नाटकांचा प्रभाव सुरुवातीच्या काळातील मराठी चित्रपटांवर होता. नुसती चित्रे, नंतर चलत्चित्र नंतर मूकपट त्यानंतर बोलपट, रंगीत चित्रांचा जमाना हा चित्रपटांचा प्रवास मल्टीप्लेक्स पासून लॅपटॉप पर्यंतच्या प्रवासापर्यंत आलेला आहे.

सुरुवातीला नाटकांचे प्राबल्य तर नंतर बोलपट युग सुरु झाल्यावर चित्रपटांचं प्रभुत्व नाटकावर असे चित्र दिसून येते.

पूर्वीच्या कालापासून नव्या सहस्त्रकाचा विचार करताना मराठी चित्रपटाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही आशादायक रुपाकडे झुकताना दिसतो आहे. या संदर्भातील सुधीर नांदगावकरांचे मत पाहिले असता याची प्रचिती येते. ते म्हणतात-

**''मराठी चित्रपटांचे नाव सध्या 'कानफाट्या' पडलेले आहे. सर्वसामान्य चित्रपट रसिकांचा विशेषत: सुशिक्षित मध्यमवर्गीय रसिकांचा, मराठी सिनेमात काही चांगले घडू शकते, काही प्रयोग होऊ शकतात यावरचा विश्वासच उडालेला** आहे.'' ...१३

इथपर्यंत त्यांचे मत वाचले तर यापूर्वीच्या सहस्रकापर्यंतचे मत बरोबर आहे असे दिसते. कारण नव्या सहस्रकात नवा आशय आणि नवा विषय घेऊन नवे दिग्दर्शक, लेखक आणि कलाकारही पुढे सरसावत असल्याचे उत्साहवर्धक चित्र मराठी सिनेमांच्या बाबतीत दिसून येते आणि म्हणूनच उपरोक्त वक्तव्याचा उत्तरार्ध एकदम वेगळा आहे. म्हणूनच नांदगावकर पुढे म्हणतात-

**''परंतु वस्तूस्थिती नेमकी उलटी आहे. आशयदृष्ट्या मराठी सिनेमा कात टाकू लागला आहे.''** ...१४

नव्या सहस्रकातील मराठी चित्रपटात उत्साहवर्धक, आशादायक बदल होत चाललेले आहेत. या विषयी जयंत राळेरासकर म्हणतात,

**''मराठी चित्रपट बदलत आहे, तो आशयातील बदल आहे, सादरीकरणात आहे, विषयात आहे, अभिनयात आहे, संगीतात आहे. मराठी चित्रपट श्रीमंत होत आहे.'' ...१५**

मराठी चित्रपटांचा पौराणिक आणि ऐतिहासिक विषयातील रस चित्रपट इतिहासाच्या पानापानांतून दिसून येतो.

इ.स. २००० ची चित्रपट प्रकाशन सुरुवातच पितांबर काळे दिग्दर्शित 'तोचि एक समर्थ' या चित्रपटाने केली. प्रभातकालीन तसेच त्याही पूर्वीची धार्मिक परंपरा जणू नव्या सहस्रकातही दिसली. कारण याच्या पाठोपाठच 'कुलस्वामिनी तुळजाभवानी' हा जनार्दन परब दिग्दर्शित चित्रपट प्रदर्शित झाला.

या वर्षी कुमार सोहोनी दिग्दर्शित 'जोडीदार' कथा-पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सतीश राजवाडे यांचं असलेला 'मृगजळ,' कांचन नायक दिग्दर्शित -'राजू' तर निर्माता दिग्दर्शक मयूर वैष्णव यांचा 'हृदयस्पर्शी' प्रदर्शित झाला. दिग्दर्शक, कथा, पटकथा-महेश मांजरेकर असलेला 'अस्तित्त्व' देखील याच वर्षी प्रदर्शित झाला. तब्बू, नम्रता शिरोडकर, स्मिता जयकर, मोहनिश बहेल इ. हिंदी-मराठी कलावंतांच्या आदाकारीने सजलेला हा चित्रपट आहे. महेश कोठारे दिग्दर्शित 'खतरनाक' हा महेश स्टाईलचा चित्रपटही प्रदर्शित झाला. यशवंत भालकर दिग्दर्शित 'सत्ताधिश' आणि दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद एन्. रेळेकर यांचा 'धनी कुंकवाचा'ही याच वर्षी प्रदर्शित झाला.

या वर्षीचे वाखाणण्यासारखे चित्रपट म्हणजे 'ध्यासपर्व,' 'अस्तित्त्व' आणि 'मृगजळ.' ३८ व्या राज्य मराठी चित्रपट महोत्सवात या चित्रपटांनी अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. 'ध्यासपर्व' चे निर्माता दिग्दर्शक होते, अमोल पालेकर. कथा-पटकथा-संवाद चित्रा पालेकर यांचे होते. छायाचित्रण- देबु देवधर, वेषभूषा-जागतिक कीर्तीच्या भानू अथय्या यांची होती. 'कल का आदमी' या नावाने याचीच हिंदी रुपांतरीत चित्रपट निर्मिती होती. विशेष म्हणजे मराठी आणि हिंदी या दोन्ही चित्रपटांत गाणी नव्हती.

द्वितीय पारितोषिक प्राप्त 'अस्तित्त्व' हा महेश मांजरेकरांचा चित्रपट याचीही हिंदी आवृत्ती काढण्यात आली होती. 'मृगजळ' - दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद सतीश राजवाडे यांचे असलेला चित्रपट. या चित्रपटाने तिसरा क्रमांक पटकावला.

२००१ सालात एकूण १८ चित्रपट प्रदर्शित झाले. दिग्दर्शक सुभाष खैरे यांचा 'सौभाग्यकांक्षिणी' कथा आणि दिग्दर्शिक अनिल सुर्वे यांचं असलेला. 'अष्टरुपा,' 'जय वैभवलक्ष्मी माता.' निर्माता, दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद जी. जी. भोसले यांचा 'सोनियाची पाऊले.' कुलदीप पवार यांची कथा आणि दिग्दर्शन असलेला- 'झकू मारली नी मुंबई पाहिली.' दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद जगन्नाथ पसाले यांचं असलेला. 'बांगड्या भरा' आणि पितांबर काळे दिग्दर्शित 'तांबव्याचा विष्णू बाळा' असे चित्रपट प्रदर्शित झाले. या वर्षातील ३९ व्या राज्य मराठी चित्रपट महोत्सवात वाखाणले गेलेले चित्रपट म्हणजे-

मिलींद उके दिग्दर्शित 'देवकी' या चित्रपटाने या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

सुहास शिरवळकर यांच्या 'देवकी' या कादंबरीवरुन हा चित्रपट निर्माण करण्यात आला होता. पटकथा आणि संवाद अभिराम भडकमकर यांचे होते. गीते - जगदीश खेबूडकरांची होती.

या स्पर्धेमधील दुसरा क्रमांक मिळविला - 'एक होती वादी' या चित्रपटाने. 'शब्दाविणा संवाद' ही लक्ष्मण जोशींची एकांकिका, यावरुन या चित्रपटाची कथा बेतली होती. पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन अजय फणसेकर यांचं होतं.

स्पर्धेतील तिसरा क्रमांक मिळविला - 'झंझावात' या चित्रपटाने. या चित्रपटाची कथा आणि पटकथा शं. ना. नवरे यांची तर संवाद - प्र. ल. मयेकर यांचे होते. छाया लेखन - जयवंत पाठारे आणि प्रकाश आनंदकर यांनी केले होते. दिग्दर्शन केलं होतं, राजदत्त यांनी.

२००२ सालात एकूण २० चित्रपट प्रदर्शित झाले. नव्या सहस्त्रकात मराठी चित्रपटांच्या आशय-विषय आणि सादरीकरणात खूप बदल दिसू लागले. चित्रपट निर्माता व्यावसायिक दृष्ट्या व्यावसायिक यशाचे गणित घालत असला तरीही नव्या बदलत्या जगाची, बदलत्या रुपाची दखल त्याला घ्यावीच लागते. याचाच परिणाम म्हणून मराठी चित्रपट विश्वात आश्वासक असे बदल हळूहळू होताना नव्या सहस्रकात निदर्शनास येते.

२००२ मधील चित्रपट पाहून या धिम्या गतीच्या परिवर्तनाविषयी आणि एकूणच मराठी चित्रपट निर्मितीतील बदलाविषयी भाष्य करताना सुधीर नांदगावकर म्हणतात,

**''४० व्या मराठी चित्रपट महोत्सवात परिक्षक म्हणून २० चित्रपट पाहताना हीच गोष्ट प्रामुख्याने माझ्या लक्षात आली. मराठी सिनेमात नवतेची चाहूल लागत आहे. अर्थात् जुन्याची वर्दळ चालू राहणारच तशी ती आहेच; पण नव्याचे स्वागत करायलाच हवे. समीक्षकांनी ते प्रेक्षकांच्या लक्षात आणून दिले तरच 'कानफाट्या' हे नाव पुसले जाऊन मराठी सिनेमाच्या भावी प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. गेलेला प्रेक्षक पुन्हा मराठीकडे वळेल. अर्थात् सिनेमाची व्यावसायिक बाजू मजबूत करणे हे निर्मात्याचे काम आहे. नव्याची चाहूल प्रेक्षकांच्या लक्षात आणून देणे हे समीक्षकांचे काम आहे.'' ...१६**

चाळीसाव्या मराठी चित्रपट महोत्सवात पुढील तीन चित्रपटांनी उत्कृष्ट चित्रपटात स्थान मिळविले. प्रथम पारितोषकपात्र चित्र ठरले. 'दहावी फ' निर्माता, दिग्दर्शक-सुमित्रा भावे, सुनिल सुकथनकर. याची कथा-पटकथा, संवाद याची जबाबदारी सांभाळली होती-सुमित्रा भावे यांनी. गीते लिहिली-सुनिल सुकथनकर आणि सुमित्रा भावे यांनी.

हा चित्रपट पुण्यात घडलेल्या सत्य कथेवर आधारित आहे. आज सर्वसामान्य मुलांना, विद्यार्थ्यांना ज्या सुखसुविधा मिळतात त्या पासून कित्येक बालके वंचित आहेत. अशा दारिद्रयरेषेखालच्या मुलांच्या भावविश्वाचं आणि समस्यांचं जिवंत चित्रण करणारा हा चित्रपट रसिकांचीही मने जिंकतो.

'१० वी फ' या चित्रपटाविषयी भाष्य करताना सुमित्रा भावे म्हणतात-

**''या चित्रपटात पौगंडावस्थेतील मुलांची हिंसक भावना दाखवण्यात आली आहे. शाळेमध्ये मिळवलेल्या गुणांनुसार 'अ' ते 'फ' अशी मुलांची विभागणी केली जाते. त्यामुळे 'अ' तुकडीतील मुलं हुशार आणि 'फ' तुकडीतील मुलं 'ढ' असा समज निर्माण झालेला दिसतो. 'फ' तुकडीतील मुलांची मानसिकता शोधण्याचा प्रयत्न आम्ही या चित्रपटातून केला आहे. 'फ' तुकडीतील बहुसंख्य विद्यार्थी हे समाजाच्या निम्न स्तरातून आलेले असल्यामुळे अनेकदा कष्टाची कामं करुन शिक्षण घेत असतात. त्यांच्या स्वत:च्या विविध समस्या असतात. याचा शिक्षकांनी विचार करावा, अशी यामागची भूमिका होती.'' ...१७**

चित्रपटासाठी मुलांची अभिनय कार्यशाळा इ.सह जोरदार तयारी करुन बालचित्र समितीकडे आर्थिक सहाय्यासाठी अर्ज केला असता त्यांनी हा चित्रपट मोठ्यांचा आहे, लहान मुलांचा नाही असे सांगून अर्थसहाय्य देण्यास नकार दिला. चित्रपटनिर्मितीत अशाही समस्यांचा सामना करावा लागतो. शेवटी वैयक्तिक पातळीवर अर्थसहाय्य जमवून चित्रपट पूर्ण करावा लागला.

एन्. एफ्. डी. सी. चे अर्थसहाय्य घेऊन निर्माण केलेला 'वास्तुपुरुष' याने दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. याचेही दिग्दर्शक आहेत-सुमित्रा भावे अणि सुनिल सुकथनकर. तसेच कथा, पटकथा, संवाद, कला, वेषभूषा इ. अनेक बाजू सुमित्रा भावे यांनी समर्थपणे सांभाळल्या आहेत. गीते- सुनील सुकथनकर यांनी लिहीली आहेत. सर्वार्थाने उत्कृष्ट भट्टी जमलेला हा चित्रपट तसेच आंतरराष्ट्रीय दर्जावर जाण्यासारखा

सशक्त चित्रपट असा नावलौकित या चित्रपटाने मिळविला. यातील सिद्धार्थ दफ्तरदार या कलाकाराने अप्रतिम काम केले आहे.

स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळविला 'भेट' ने. दिग्दर्शन आहे, बिनधास्त फेम चंद्रकांत कुलकर्णी यांचं. संगीत दिलंय- अशोक पत्की यांनी. रोहिणी कुलकर्णी यांच्या भेट या लघुकादंबरीतील कथा या चित्रपटासाठी घेतली आहे. पटकथा, संवाद- प्रशांत दळवी यांचे आहे. गीतकार आहेत- दासू वैद्य. छायालेखन केलंय- समीर आठल्ये यांनी.

'सत्तेसाठी काहीही'- निर्माता, दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद या सर्व बाजू सांभाळल्या आहेत, रविंद्र महाजनी यांनी. सत्तेसाठी सत्ताधीश कोणत्याही थराला जाऊ शकतो आणि लोकशाही उघड्या डोळ्यांनी बघण्याशिवाय काही करु शकत नाही, असा विषय महाजनींनी चांगल्या तऱ्हेने हाताळलाय.

याप्रमाणेच श्री जगद्‌गुरु संत तुकाराम, रेशमगाठ, आधारस्तंभ, संकल्प, सत्यमेव जयते, मराठा बटालियन, लाभले सौभाग्याचे लेणे, गाव एक नंबरी इ. चित्रपट या वर्षी प्रदर्शित झाले.

२००३ मधील उल्लेखनीय चित्रपट म्हणजे - 'नॉट ओन्ली मिसेस राऊत' हा गजेंद्र अहिरे दिग्दर्शित चित्रपट याला प्रथम राष्ट्रीय पारितोषिक मिळाले.

अमोल पालेकर दिग्दर्शित - 'अनाहत' चाही विशेष उल्लेख करावा लागेल.

जय सद्‌गुरु फिल्मस्‌चा 'शल्य' असाच वेगळा चित्रपट आहे.

ऑस्करपर्यंत धडक दिलेल्या 'श्वास' ने मात्र मराठी चित्रपट निर्मितीत नवे चैतन्य आणले. सगळीकडे या चित्रपटाचे व चित्रपटातील कलावंतांचे कौतुक झाले. मराठी चित्रपट, कथा, पटकथा, चित्रीकरण थोडक्यात सादरीकरण या सगळ्या पातळीवर श्रेष्ठ दर्जा गाठतो आहे हे 'श्वास' ने सिद्ध केलं.

याच वर्षीचा 'बापू बिरु वाटेगावकर' चरित्र कथानकाच्या वाटेने जाणारा चित्रपट. प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

२००४ मध्ये मराठी चित्रपटाने विक्रमी आकडा गाठला. जवळजवळ ५५ चित्रपट या वर्षी सेन्सॉर झाले. वाखाणण्यासारखे चित्रपट म्हणजे - देवदासी, पांढर, देवराई, चकवा, अगं बाई अरेच्या आणि सलाम द सॅल्यूट इ.

अनेक डॉक्युमेंटरीज, अनेक चित्रपट बनविणाऱ्या श्रीमती सुमित्रा भावे यांना वास्तविक

या चित्रपट क्षेत्राचा कोणताही अनुभव नव्हता. पूर्वी चित्रपट बनविण्याची महत्त्वाकांक्षा वगैरे काहीही नव्हती. या सगळ्या चित्रपट निर्मितीच्या अनुभवांतून गेल्यानंतर त्या म्हणतात,

**''चित्रपट निर्मितीचा एक अपरिहार्य भाग म्हणजे अपार आर्थिक ओढाताणीचा, कष्ट, चिंता, विवंचनांचा. गरीब चित्रपटकर्ते आणि गरीब प्रेक्षक यांच्याशी छापापाणी खेळणारं आर्थिक पाठबळ, पण हेही नक्की की चमत्कार घडावेत तसं यातून मार्गही निघत आले आहेत. चित्रपट निर्मितीसाठी उपलब्ध होणारा निधी हा नेहमीच तुटपुंजा असल्यामुळे चित्रपटाच्या तांत्रिक बाबींमध्ये आम्हाला बरीच तडजोड करावी लागते. कमी बजेटमध्ये चित्रपट पूर्ण करण्याची कसरत जरी करावी लागत असली तरी चित्रपट निर्मितीचा आनंद आम्हाला सुखावणारा, आनंद देणारा असतो.'' ...१८**

हा फरक आहे हिंदी चित्रपट निर्मितीमध्ये आणि प्रादेशिक चित्रपट निर्मितीमध्ये. विशेषत: मराठी चित्रपट निर्मितीला या सगळ्या अडथळ्यांची शर्यत पार पाडण्याची जबरदस्त कसरत पार पाडावी लागते.

एवढ्या मर्यादा असूनही 'सावरखेड एक गाव' सारखा चित्रपट हिंदीच्या तोडीस तोड वाटायला लागतो. स्मिता तळवलकरांच्या 'सातच्या आत घरात' आजची ज्वलंत समस्या मांडतो. तरुणाईला आणि पालकांना सावध करताना तो सर्व समाजालाच धोक्याचा ईशारा देतो व सावध राहण्याची सूचनाही देतो.

गेल्या वर्षीची मराठी चित्रपट निर्मितीची घोडदौड २००५ मध्ये आणखी पुढे गेलेली दिसते. जवळजवळ ६० च्या आसपास चित्रपट यावर्षी सेन्सॉर संमत झाले.

'नवरा माझा नवसाचा' खास सचिन पिळगावकर स्टाईलचा नर्मविनोदी चित्रपट प्रेक्षकांची मने जिंकतो. 'पक् पक् पकाक' आशिष रेमो यांच्या चित्रपटात बाल कलाकारांची अदाकारी वाखाणण्यासारखी आहे. नाना पाटेकर यानेही एक वेगळ्या स्वरुपाची भूमिका यात साकारली आहे.

महेश कोठारे यांनी 'खबरदार' मधून आपले वेगळेपण पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. हिंदीशी स्पर्धा करणारे सादरीकरण आणि नाविन्याचा कोठारेंचा ध्यास वाखाणण्यासारखा आहे.

'कायद्याचं बोला' यातून वेगळ्या शैलीचा मकरंद अनासपुरे हा कलाकार रसिकांपुढे सादर झाला. 'आम्ही असू लाडके' दिग्दर्शक अभिराम भडकमकर यांनी मतीमंदांच्या समस्या हृदयस्पर्शी भाषेत सादर केल्या. 'नितळ' मध्ये सुमित्रा भावे, सुकथनकर यांनी कोडासारखी समस्या संयमीत स्वरुपात मांडली. कोठेही प्रचारकी थाट नाही.

'डोबिंवली फास्ट' हा निशिकांत कामत दिग्दर्शित चित्रपट, देशात आणि विदेशात मराठी चित्रपटाचे अस्तित्त्व पोहचविण्यास कारणीभूत झालेला चित्रपट. स्वत:ची मूल्ये जपणारा, सहनशील वृत्ती जपणारा हा मुंबईकर आक्रमक होतो, ही कथा मनाला भिडते.

## ४.७ समारोप

मराठी चित्रपट निर्मितीनं खरं म्हणजे चित्रपट निर्मितीचा पाया घातला. कालमानाप्रमाणे मराठी चित्रपटाने अनेक चढउतार पाहिले. सरकारी योजनांच्या विविध सोयीसवलतींचे परिणामही मराठी चित्रपट निर्मितीवर झाले.

शासनाच्या सवलतीच्या योजनांमुळे चित्रपट निर्मिती वाढली. संख्यात्मक वाढीचा परिणाम, गुणात्मक दर्जा घसरण्यावरही झाला. वाढत्या निर्मितीमुळे चित्रपटगृहे प्रदर्शनासाठी अपुरी पडू लागली. पुन्हा वेगळ्या अडचणींना मराठी चित्रपट निर्मितीला सामोरे जावे लागले.

आजच्या घटकेला शासनाचे अनुदान आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे हक्कविक्री यातून मराठी चित्रपटाला नवी संजीवनी मिळाली आहे. आज मल्टीप्लेक्समध्येही मराठी चित्रपट दिमाखाने प्रदर्शित होत आहेत. ऑस्करची दारे ठोठावत आहेत. देशातीलच नव्हे तर परदेशातील रसिकांचेही लक्ष आपल्याकडे वेधून घेणारे मराठी चित्रपट भविष्यकाळात यशाच्या नव्या नव्या वाटा शोधायला लागतील याची चाहूल लागू लागली आहे.

***

## संदर्भ सूची


१. शेवाळे माधव- भारतीय चित्रपट- निहारा प्रकाशन, पुणे. मार्च १९९३, पृष्ठ क्र. १५.
२. दीक्षित विजय- चित्रपट एक कला - रेणुका प्रकाशन १९७९, पृष्ठ क्र. ९९.
३. मराठी विश्वकोशखंड.
४. झणकर अनिल -सिनेमाची गोष्ट - राजहंस प्रकाशन, पुणे १९९७. पृष्ठ क्र. ३.
५. झणकर अनिल - तदेव - पृष्ठ १७.
६. संपकाळ अनिल - मराठी चित्रपटाची पटकथा - प्रतिमा प्रकाशन २००५. पृष्ठ क्र. ६७.
७. संपकाळ अनिल - तदेव - पृष्ठ क्र. ६७.
८. साठे वसंत - बखर सिनेमाची १९९२. प्रकाशक - किरण व्ही. शांताराम, पृष्ठ क्र. २०-२१.
९. संपकाळ अनिल - उपरोक्त. पृष्ठ क्र. ६८.
१०. साठे वसंत - उपरोक्त - पृष्ठ क्र. ११७
११. साठे वसंत - तदेव - पृष्ठ क्र. १२१.
१२. साठे वसंत - तदेव -पृष्ठ क्र. १२१.
१३. नांदगावकर सुधीर - रुपवाणी - चित्रपट विशेषांक २००३ - पृष्ठ क्र. ४.
१४. नांदगावकर सुधीर - तदेव - पृष्ठ क्र.४.
१५. राळेरासकर जयंत - नवरंग रुपेरी - संपादन - अशोक उजळंबकर -दिवाळी विशेषांक २००८ - पृष्ठ ७५.
१६. नांदगावकर सुधीर - तदेव - पृष्ठ ५.
१७. भावे सुमित्रा - लेख - माझे चित्रपट जीवन. स्त्री विकासाचे नवे क्षितिज - विभाग ६ वा, पृष्ठ ७३९.
१८. भावे सुमित्रा - तदेव - पृष्ठ क्र. ७४३.


□□□